# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग
ईमेल - nagarsachiv.mbmc@gmail.com

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./02/2020-21 दिनांक :- 9/9/2021

प्रति,
जन माहिती अधिकारी तथा,
सहा. लेखपरीक्षक,
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- <u>केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम 2005.</u>
सन 2010-11, 2011-12 या वर्षाचे AG Report अहवालाची माहिती देणेबाबत.

संदर्भ :- आपणांकडील जा.क्र.मनपा/मु.ले.प./मा.अ./89/2020-21 दि. 6/01/2021 रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये, आपण सन 2010-11, 2011-12 या वर्षाचे AG Report अहवालाची माहिती देणेबाबत कळविलेले आहे.

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, सन 2010-11, 2011-12 या वर्षाचे AG Report अहवालाची नगरसचिव विभागासंबंधीत माहिती निरंक आहे.

कळावे.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

पोच
13/9/2021
लिपिक
अलेप विभाग

pc 2\\Pranali\\d\\Pranali\\Mahiti Adhikar\\Letter - Saha. Lekhaparikshak.doc

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय

छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता. जि. ठाणे - 401 101

माहितीचा अधिकार

जा.क्र.मनपा/मु.ले.प./मा.अ./ ८९ /2020-21 दि. ०६/०१/2021

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
स.ब./न.स.बा./४५७
आवक क्र. ०२१/२०२१
दिनांक:- ८/१/२०२१

प्रति,

जन माहिती अधिकारी,

सर्व विभाग,

मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- माहिती अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत
सन 2010-11, 2011-12 या वर्षाचे AG Report अहवालाची माहिती देणेबाबत...

संदर्भ :-
1. दि. 07/08/2019 रोजीचा माहिती अधिकार अर्ज. (प्राप्त दि. 23/08/2019)
2. दि. 04/11/2019 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी सात दिवसांत लेखी माहिती अर्जदारास देणेबाबतचे दि. 06/11/2019 रोजीचे आदेश.
3. इकडील जा.क्र.मनपा/मुलेप/82/2019-20, दि. 06/11/2019 अन्वये अर्जदारास माहितीच्या अर्जातील आवश्यक माहिती देणेबाबत विभागास कळविल्याचे पत्र.
4. मा. राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठ यांचेकडील दाखल द्वितीय अपील क्र. के.आर.83/2020, सुनावणी दि. 25/09/2020 रोजी सुनावणी होऊन, सुनावणी निर्णय दि. 04/01/2021 रोजी प्राप्त.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये दि. 07/08/2019 रोजीचा दि. 23/08/2019 रोजी प्राप्त श्री. संतोषकुमार तिवारी, यांच्या माहिती अधिकाराच्या अर्जातील माहिती आपले विभागाशी संबंधीत असून अपीलार्थीस अपेक्षीत माहिती मुदतीत न मिळाल्याने अपीलार्थी यांनी दि. 02/11/2019 रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलाच्या सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सर्व जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे विभागाची माहिती अपीलार्थीस सात दिवसांत देणेत यावी म्हणून संदर्भीय 2 अन्वये दि. 06/11/2019 रोजीच्या आदेशान्वये कळविले होते. तद्नंतरही अपीलार्थीस अपेक्षीत माहिती पुरविण्यांत न आल्याने, अपीलार्थी यांनी व्यथीत होऊन दि. 03/01/2020 रोजी द्वितीय अपील मा. राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठ यांचेजवळ दाखल केले. सदर द्वितीय अपीलाची दि. 25/09/2020 रोजी सुनावणी झाली असून, सदर सुनावणीत दिलेल्या निर्देशानुसार खालील प्रमाणे आपले विभागाशी संबंधीत माहिती साक्षांकित करुन दि. 12/01/2021 पर्यंत लेखापरीक्षण कार्यालयात सादर करावी.

1. सन-2010 ते 2011 व सन-2011 ते 2012 चे AG रिपोर्टची प्रत व महालेखापरीक्षकाच्या अहवालाची प्रत.
2. महाराष्ट्र सरकारद्वारा नियुक्त झालेले ऑडीटसंद्वारा मनपाचे संपूर्ण विभागांना देण्यांत आलेल्या स्मरणपत्राची प्रत.

वरील माहिती अपीलार्थीस मुदतीत उपलब्ध करुन द्यावयाची असल्याने, कृपया विलंब टाळावा व चार दिवसांत माहितीच्या साक्षांकित छायांकित प्रती लेखापरीक्षण कार्यालयात जमा कराव्यात. मुदतीत प्राप्त झालेली माहिती अपीलार्थीस देण्यांत येईल. ज्या विभागाची माहिती उपलब्ध होणार नाही, अशा विभागाची नावे मा. राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठ यांना कळविण्यांत येईल. याची नोंद घ्यावी, ही विनंती.

(चारुशिला खरपडे)
जन माहिती अधिकारी तथा
सहा. लेखापरीक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव :-
श्री. संतोष कुमार तिवारी,
सी 04 न्यु. मीरा पॅराडाईज, गिता नगर,
मिरा भाईंदर रोड, मिरा रोड (पुर्व), ठाणे.

सोबत :- विभागांची यादी जोडली आहे.

D-Audit-लेटर्स-माहिती अधिकार